आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१२ जून २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- १८व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन येत्या २४ जूनपासून सुरु होणार
- भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर येत्या तीन आर्थिक वर्षांमध्ये ६ पूर्णांक ७ दशांश टक्के इतका राहील असा जागतिक बँकेचा अंदाज
- आंध्र प्रदेशच्या नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न
- लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी यांची नवे लष्करप्रमुख म्हणून नियुक्ती

**आणि**

- शेअर बाजारात तेजी, राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २३ हजार ४२० अंकांच्या विक्रमी स्तरावर.

<><><><><>

१८व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन या महिन्याच्या २४ तारखेपासून सुरू होणार आहे. या अधिवेशनात नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी, लोकसभेच्या सभापतींची निवड, राष्ट्रपतींचं अभिभाषण आणि त्यावर चर्चा होईल. राज्यसभेचं २६४वं अधिवेशन २७ जूनपासून सुरू होईल आणि संसदेचं हे अधिवेशन ३ जुलै रोजी संपेल. संसद म्हणजे १४० कोटी भारतीयांच्या इच्छा आणि आकांक्षांवर चर्चा, विचार-विनिमय करण्याचं आणि त्या पूर्ण करण्यासाठी काम करण्याचं उत्तम व्यासपीठ आहे, असं केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

<><><><><>

केंद्रीय अर्थ आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रीपदाचा पदभार निर्मला सीतारामन यांनी स्वीकारला. पदभार स्वीकारल्यानंतर केंद्रीय अर्थ आणि का◌ॅर्पोरेट व्यवहार मंत्री म्हणून काम करण्याची संधी पुन्हा दिल्याबद्दल त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. अर्थ मंत्रालयाच्या विविध विभागांच्या सचिवांनी त्यांना विविध धोरणात्मक मुद्द्यांवर माहिती दिली.

भाजपचे ज्येष्ठ नेते नितिन गडकरी यांनी आज रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारला. यावेळी त्यांनी ही जबाबदारी पुन्हा सोपवल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. रस्ते वाहतूक आणि महामार्ग राज्यमंत्री अजय टमटा आणि हर्ष मल्होत्रा यांनीही आज मंत्रालयाची सूत्रं हातात घेतली.

भाजप नेते पियुष गोयल यांनी काल नवी दिल्लीत वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाचा पदभार स्वीकारला. तरुणांकरता नवीन संधी निर्माण करण्यासाठी आणि सर्व नागरिकांच्या कल्याणासाठी अथकपणे काम करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं ते यावेळी म्हणाले. पदभार स्वीकारल्यानंतर गोयल यांनी दोन्ही विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली. विविध धोरणं आणि उपक्रमांना अंतिम स्वरूप देण्याबाबत चर्चा करण्यासाठी येत्या काही दिवसांत बैठका आयोजित करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

<><><><><>

भारत नजिकच्या भविष्यात जगातली सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था राहील, असा अंदाज जागतिक बँकेच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका अहवालात वर्तवण्यात आला आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर येत्या तीन आर्थिक वर्षांमध्ये ६ पूर्णांक ७ दशांश टक्के इतका राहील, असंही जागतिक आर्थिक

अपेक्षांसंबंधीच्या या अहवालात म्हटलं आहे. स्थानिक पातळीवर चांगली मागणी, गुंतवणुकीत वाढ आणि सेवा क्षेत्रातली वाढती उलाढाल यामुळे या आर्थिक वाढीला चालना मिळण्याचा अंदाज आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी देशाचा अर्थव्यवस्था वाढीचा दर ६ पूर्णांक ६ दशांश टक्के राहील, असा अंदाज अहवालात वर्तवण्यात आला आहे.

**<><><><><>**

जागतिक लिंग गुणोत्तर निर्देशांकात भारताची १२९ व्या स्थानावर घसरण झाल्याचं वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या आज जाहीर झालेल्या अहवालात म्हटलं आहे. तर दक्षिण आशियामध्ये भारत पाचव्या स्थानावर आहे. बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका आणि भूतान हे देश भारताच्या पुढे असून या क्रमवारीत पाकिस्तानचा क्रमांक शेवटचा आहे. जागतिक क्रमवारीत आइसलँडने आपलं अव्वल स्थान कायम ठेवलं आहे.

दरम्यान, जागतिक क्रमवारीत घसरण झाली असली तरी माध्यमिक शिक्षण आणि राजकारणात भारताने लिंग गुणोत्तरात समतोल साधल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

तेलुगु देसम पार्टीचे अध्यक्ष नारा चंद्राबाबू नायडू यांनी आज आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यपाल एस अब्दुल नझीर यांनी नायडूंसह २४ मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. जनसेना पार्टीचे अध्यक्ष के. पवन कल्याण यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. २४ जणांच्या मंत्रमंडळात तेलुगु देसमचे नारा लोकेश यांचा समावेश आहे. मंत्रिमंडळात ३ जनसेना पक्षाचे असून भाजपाचा एक मंत्री आहे.

कृष्णा जिल्ह्यात केसरपल्ली आयटी पार्क इथं झालेल्या या सोहळ्याला केंद्रीय मंत्री अमित शहा, जे. पी नड्डा, नितीन गडकरी, जी. किशन रेड्डी, रामदास आठवले, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसंच आंध्र प्रदेशच्या इतर शेजारी राज्यांचे मुख्यमंत्री माजी **उप**राष्ट्रपती एम वेंकय्या नायडू, चित्रपट अभिनेते रजनीकांत आणि चिरंजीवी उपस्थित होते. सिंगापूर, जपान, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया आणि फ्रान्स या देशांचे प्रतिनिधीही यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

भाजपाचे ज्येष्ठ नेते मोहन चरण माझी आज ओदिशाच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. भुवनेश्वरच्या जनता मैदानावर आज संध्याकाळी त्यांचा शपथविधी सोहळा होणार आहे. त्यांच्यासोबत कनकवर्धन सिंह देव आणि प्रवती परिदा हे उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेणार आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं नीट २०२४ परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर काही वारंवार विचारले जाणारे प्रश्न अर्थात FAQ जारी केले आहेत. या महिन्याच्या ४ तारखेला जाहीर झालेल्या नीट निकालातल्या कथित विसंगतींच्या पार्श्वभूमीवर हे FAQ जारी करण्यात आले आहेत. वेळेचे नुकसान झालेल्या परीक्षार्थींना गुण देण्याबाबत समिती स्थापन करण्यात आली असून या समितीने तथ्यात्मक अहवालांच्या आधारे तक्रारींचा विचार केल्याची माहिती तक्रार निवारण समितनं दिली आहे.

**<><><><><>**

लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी यांची नवे लष्करप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते या महिन्याच्या ३० तारखेला पदभार स्वीकारतील.

विद्यमान लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे ३० जून रोजी सेवानिवृत्त होत आहेत. लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी आपल्या दीर्घ कारकीर्दीत वेगवेगळ्या पदांवर काम केलं आहे. त्यांना परमविशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदकानं गौरवण्यात आलं आहे. सध्या ते लष्कर उपप्रमुख म्हणून कार्यभार सांभाळत आहेत.

<><><><><>

देशाच्या प्रधानमंत्रीपदी नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा विराजमान झाल्यानं शेतकऱ्यांच्या आशा आणि अपेक्षा उंचावल्या आहेत. महाराष्ट्रातही शासन शेतकऱ्यांच्या हिताचेच निर्णय घेत आहे, केंद्रीय कृषी मूल्य आयोगाच्या माध्यमातून पिकांना चांगली किमान आधारभूत किंमत मिळेल आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल कृषी मूल्य आयोगाच्या बैठकीला उपस्थितांना संबोधित करताना व्यक्त केली. रब्बी पिकांसाठी किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी पश्चिम भारतातील राज्यांच्या प्रतिनिधींची ही बैठक होती.

केंद्रीय कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष विजय पाल शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, गोवा, दीव आणि दमण तसंच महाराष्ट्राच्या प्रतिनिधी आणि शेतकऱ्यांची बैठक मुंबईत झाली.

<><><><><>

विधान परिषदेच्या नाशिक शिक्षक मतदार संघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संदीप गुळवे महाविकास आघाडीचे उमेदवार असतील असं आज जाहीर करण्यात आलं. मुंबई पदवीधर मतदारसंघासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने अनिल परब यांना उमेदवारी दिल्याचं पक्षाध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी आज मुंबईत जाहीर केलं. कोकण पदवीधर मतदारसंघात शिवसेनेचे

संजय मोरे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला असून ही जागा कॉंग्रेस लढवणार आहे.

<><><><><>

गेले २ दिवस दबावाचा सामना करणाऱ्या भारतीय शेअर बाजारात आज दिवसाची सुरुवात तेजीत झाली. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी आज बाजार उघडताच  ८० अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ३४४ अंकावर पोचला. गुंतवणूकदारांनी खरेदीचा सपाटा लावल्यानं निफ्टीत तेजी आली. त्यामुळे १६० अंकांची वाढ नोंदवत निफ्टी २३ हजार ४२० अंकांच्या आजवरच्या विक्रमी स्तरावर पोहोचला.

मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक देखील आज सकाळी  २२३ अंकांनी वधारून ७६ हजार ६७९ वर पोहोचला. यामुळे गुंतवणूकदारांनी जोरदार खरेदी सुरू केली. परिणामी सकाळी १० वाजता निर्देशांकात आणखी ५०० अंकांची वाढ झाली. आणि तो ७६ हजार ९६८ अंकावर पोहोचला.

<><><><><>

देशात १ जुलै पासून भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम लागू केले जाणार आहेत. या कायद्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी पत्र सूचना कार्यालय देशभरात अनेक ठिकाणी परिसंवाद आयोजित करणार आहे, असं माहिती सेवा विभागाचे अधिकारी राजेश सिन्हा यांनी सांगितलं. याच निमित्तानं उद्यापासून रांची इथं आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादाबाबत ते पत्रकारांशी बोलत होते.

<><><><><>

डोंबिवली एमआयडीसीतल्या इंडो अमाईन्स आणि अन्य एका कारखान्याला आज सकाळी १० वाजताच्या सुमाराला आग लागली. घटनास्थळी कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर आणि नवी मुंबई इथल्या अग्निशमन यंत्रणेकडून आग विझवण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. गेल्याच महिन्यात डोंबिवलीतल्या अमुदान या रसायनांच्या कारखान्यात भट्टीचा स्फाेट होऊन आग लागली होती.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्रख्यात सरोद वादक राजीव तारानाथ यांचं काल कर्नाटकात म्हैसूर इथं निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर आज दुपारी म्हैसूर इथं अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. उस्ताद अली अकबर खान यांचे शिष्य असलेल्या तारानाथ यांनी गेली कित्येक वर्षं जगभरातल्या रसिकांना आपल्या सरोद वादनानं मंत्रमुग्ध केलं. त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजल्या गेलेल्या अनेक कन्नड चित्रपटांना संगीतही दिलं आहे.

**//<><><><><>//**